# जाहिरात

एकात्मिक बाल विकास सेवा योजना, बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) मालेगांव, जि.नाशिक यांचे कार्यालय अंतर्गत अंगणवाडी सेविका/मदतनिस भरती प्रक्रिया सन २०२२-२०२३ साठी महानगरपालिका मालेगांव व नगरपालिका सटाणा शहरातील अंगणवाडी सेविका व मदतनिस रिक्त पदांसाठी अनुक्रमे रु.८३२५/- प्रति महिना व रु.४४२५/- प्रति महिना असे एकत्रित मानधनी तत्त्वावर निवडीसाठी सरळ नियुक्तीने (By Nomination) भरण्यासाठी मालेगांव व सटाणा शहरातील पात्र महिला उमेदवारांकडून खालील अटी व शर्तीनुसार विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अटी व शर्ती :**

१. **शैक्षणिक पात्रता :-** अंगणवाडी सेविका व मदतनिस पदासाठी अर्जदार **किमान १२वी उत्तीर्ण** असणे आवश्यक आहे. इ.१२ वीचे गुणपत्रकाची सत्यप्रत आवश्यक असुन सदरील गुणपत्रक नसल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. यापेक्षा उच्चत्तम शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवाराने आवश्यक शैक्षणिक कागदपत्रांच्या व गुणपत्रिकांच्या सत्यप्रती सादर कराव्यात.

२. **वास्तव्याची अट** :- उमेदवार महिला स्थानिक रहिवाशी असावी. स्थानिक रहिवाशी म्हणजेच ज्या शहरातील अंगणवाडी सेविका व मदतनिस पदासाठी अर्ज केलेला असेल त्याच शहरातील रहिवाशी महिला अर्जदार असणे आवश्यक आहे. यासाठी रहिवाशी दाखला म्हणुन शासकिय दस्तऐवज (जसे : आधारकार्ड/मतदान ओळखपत्र इ.) जोडणे आवश्यक आहे.

३. **वयाची अट :-** अंगणवाडी सेविका व मदतनिस या पदासाठी वयोमर्यादा किमान १८ वर्षे व कमाल ३५ वर्षे राहिल. तसेच विधवा उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा ४० वर्षे राहिल. त्याकीरता शाळा सोडल्याचा दाखला किंवा १०वी उत्तीर्ण बोर्डाचे प्रमाणपत्र किंवा जन्मदाखल्याची सत्यप्रत जोडणे आवश्यक राहिल. उमेदवाराचे किमान व कमाल वय हे जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकास गणण्यात येईल.

४. **लहान कुटुंब :-** वरील पदासाठी अर्ज करणा-या उमेदवारांस लहान कुटुंबाची अट लागु राहिल. उमेदवारांस दोन पेक्षा जास्त हयात अपत्ये (दत्तक दिलेल्या अपत्यांसह) नसावीत. अर्जासोबत दिलेल्या नमुन्यात लहान कुटुंबाबाबतचे प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक राहिल. अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

५. **मराठी भाषेचे ज्ञान :-** रिक्त पदांचा तपशिल दर्शविणा-या तक्ता अ, ब व क मधील सर्व सेविका व मदतनिस रिक्त पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांस मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. रिक्त पदे दर्शविणा-या **तक्ता अ मधील मालेगांव शहरातील अनुक्रमांक १,२,३,४ व तक्ता ब मधील मालेगांव शहरातील अनुक्रमांक १४ ते ६४** या अंगणवाडी केंद्रात ५०% पेक्षा जास्त मुले मराठी भाषाव्यतिरिक्त हिंदी/उर्दु भाषा बोलणारी असल्याने सदर अंगणवाडी केंद्रातील सेविका व मदतनिस पदासाठी अर्ज करणा-या महिला उमेदवारांना **मराठी भाषेसोबतच हिंदी/उर्दु भाषेचे ज्ञान (लिहिता व वाचता येणे) असणे आवश्यक आहे.** तथापि अशा उमेदवाराने इ.१० वी अथवा त्यापुढील शैक्षणिक अर्हतेपैकी किमान एक अर्हता **मराठी भाषा विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक राहिल.**

६. **उमेदवार विधवा असल्यास :-** महानगरपालिका/नगरपालिका यांचेकडील पतीचे मृत्यु प्रमाणपत्र जोडावे.

७. **उमेदवार अनाथ असल्यास :-** संबंधित विभागीय उप-आयुक्त, महिला व बाल विकास विभाग यांचे प्रमाणपत्र जोडावे.

८. **मागासवर्गीय उमेदवारांनी** सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह अर्ज करावा.

९. **अनुभव :-** उमेदवारास एकात्मिक बाल विकास सेवा योजनेची अंगणवाडी सेविका/ मिनी अंगणवाडी सेविका/अंगणवाडी मदतनिस म्हणुन कामाचा किमान दोन वर्षाचा अनुभव असल्याशिवाय अनुभवासाठी असलेले गुण देण्यात येणार नाहीत. असा अनुभव उमेदवारांस असल्यास त्याबाबतचे सक्षम अधिका-याचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. मान्यता प्राप्त खाजगी व स्वयंसेवी, अनुदानित/विना अनुदानित संस्थेतील कामाचा अनुभव ग्राहय धरला जाणार नाही व याबाबतचा कोणताही युक्तिवाद उमेदवाराने केल्यास अपात्र ठरविण्यात येईल.

१०. उमेदवाराने अर्जामध्ये शहराचे नांव, सेविका व मदतनिस यापैकी ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या पदाचे नांव याचा **स्पष्ट उल्लेख करावा.** सेविका व मदतनिस दोन्ही पदासाठी अर्ज करावयाचा असल्यास दोन्ही पदाच्या नावांचा स्पष्ट उल्लेख अर्जामध्ये करावा. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही.

११. **एका उमेदवाराने एकच अर्ज** सादर करावा. उमेदवाराने एकापेक्षा जास्त केंद्रांच्या पदांसाठी वेगवेगळे अर्ज सादर केल्यास एकच अर्ज विचारात घेण्यात येईल व त्याबाबत उमेदवाराशी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१२. अर्जासोबत जन्मतारखेचा पुरावा, शैक्षणिक पात्रतेचा दाखला, जातीचे प्रमाणपत्र (स्वत:चे नावाचे), अनुभव प्रमाणपत्र, विधवा (अटी व शर्तीमधील क्र.६ नुसार दाखला) अनाथ महिला असल्यास (अटी व शर्तीमधील क्र.७ नुसार दाखला) इ.च्या **सक्षम प्राधिका-याकडून साक्षांकित केलेल्या प्रती जोडणे आवश्यक आहे,** जोडले नसल्यास अगर साक्षांकित नसल्यास याबाबतचे गुण दिले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. तसेच अर्ज सादर करण्याचा **अंतिम दिनांक २३.०३.२०२३ नंतर** कोणत्याही **प्रकारचे दस्तऐवज स्विकारले जाणार नाही.**

Scanned with CamScanner

१३. शहराचे नांव व पदाचे नांव नमुद केलेले नसणे, अर्ज अपुर्ण भरलेला असणे, खाडाखोड असणे, उमेदवाराची विहित ठिकाणी स्वाक्षरी नसणे तसेच अर्जाच्या सोबत आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या छायांकित व साक्षांकित प्रती नसणे इ.कारणांमुळे अर्ज अपात्र ठरविण्यात येतील व त्यासंबंधी उमेदवारांस कळविण्यात येणार नाही.

१४. **अंतिम दिनांकानंतर** आलेल्या किंवा डाकेने (पोष्टामुळे) विलंब झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

१५. **निवड कार्यपध्दती :-** महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का-६, दिनांक ०२.०२.२०२३ नुसार उमेदवारांनी अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवरुन इयत्ता १०वी/१२वी/पदवी/पदव्युत्तर/पदविका/डिएड/बीएड/संगणक परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र यामध्ये त्यांना मिळालेल्या गुणांनुसार तसेच विधवा/अनाथ, जात प्रवर्ग, अनुभव इ.साठी त्यांचे प्रमाणपत्रांवरुन मिळालेल्या एकुण गुणांनुसार गुणानुक्रमाने पात्र उमेदवारांची शहरातील रिक्त पदांच्या संख्येनुसार निवड करण्यात येईल. या पदांकरीता लेखी परिक्षा अथवा मुलाखत घेतली जाणार नाही. अर्जा सोबत जोडलेल्या प्रमाणपत्रांनुसार शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे उमेदवारांना गुण देऊन प्राथमिक गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल. त्यावर अर्ज करणा-या उमेदवारांना आक्षेप / तक्रार असल्यास अर्ज केलेल्या उमेदवारांनी १० दिवसांचे आंत लेखी तक्रार बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) मालेगांव कार्यालयाकडे सादर करावी. सदर तक्रारींची शहानिशा करुन अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल.

१६. अंतिम निवड झालेल्या उमेदवारांनाच निकालाबाबत कळविण्यात येईल. इतर उमेदवारांना कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१७. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व / किंवा अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती सदर प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर किंवा निवड झाल्यानंतरही रद्द करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांच्या नियुक्ती वेळी मुळ कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहिल, अन्यथा निवड प्रक्रियेतुन अपात्र ठरविण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांना सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन देणे बंधनकारक राहिल.

१८. एखादया उमेदवाराने त्याच्या निवडीसाठी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यांस निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

१९. अंगणवाडी सेविका व मदतनिस यांना शासन दरानुसार दरमहा मानधन देय आहे. शासकिय नियमानुसार एकत्रित मानधनात वेळोवळी करण्यात आलेली वाढ नियमानुसार अनुज्ञेय राहिल. मात्र मानधना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते सवलती अनुज्ञेय नाही.

२०. अंगणवाडी सेविका व मदतनिस हे एकत्रित मानधनावरील मानधनी स्वरुपाचे पद आहे. सदर पद बढती/बदली/सेवानिवृत्ती/वेतनवाढ इ.शासकिय सवलतीस पात्र नाही.

२१. संबंधित शहरातील अंतिम निवड यादी जाहिर झाल्यानंतर गुणानुक्रमे सेविका व मदतनिस यांची निवड करण्यात येईल व गुणानुक्रमानुसार अंगणवाडी केंद्र देण्यात येईल. त्यामुळे निवड झालेल्या उमेदवारांना त्या-त्या शहरातील कोणत्याही अंगणवाडी केंद्रावर काम करावे लागेल. उमेदवाराची एकदा नियुक्ती झाल्यावर कोणत्याही परिस्थितीत त्यांची इतर ठिकाणी बदली करता येणार नाही, तसेच त्यांचे निवासस्थानापासुन नियुक्ती देण्यात आलेल्या ठिकाणापर्यंत कोणताही प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही. त्याचप्रमाणे नियुक्ती झालेल्या ठिकाणी सतत गैरहजर राहिल्यास त्यांची नियुक्ती खंडीत करणेत येईल. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपुर्वी विहित नमुन्यात करारनामा करुन देणे बंधनकारक राहिल.

२२. **प्रतिक्षा यादी :** एकुण प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारावर उमेदवारांची प्रतिक्षा यादी ठेवण्यात येईल. काही कारणामुळे उमेदवार नियुक्ती आदेशाच्या दिनाकांपासुन ३० दिवसांत रुजु न झाल्यास किंवा त्यांस अपात्र ठरविण्यात आल्यास प्रतिक्षा यादीतील गुणानुक्रमानुसार पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल व सदर क्षेत्रात कोणत्याही कारणास्तव पद रिक्त झाल्यास अथवा नविन पद निर्मिती झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांस गुणानुक्रमे नियुक्ती देण्यात येईल. सदर प्रतिक्षा यादी निकाल जाहीर झाल्यापासुन एक वर्ष वैध राहिल.

२३. **अपिल :** सेविका व मदतनिस या पदावरील घोषित निवडी संदर्भात कोणत्याही उमेदवाराची तक्रार असल्यास निवड यादी घोषित झाल्यापासुन ३० दिवसांचे आंत विभागीय उप-आयुक्त, महिला व बाल विकास, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे तक्रार करावी व मा.विभागीय उप-आयुक्त, महिला व बाल विकास, नाशिक विभाग, नाशिक यांनी दिलेल्या निर्णयामुळे तक्रारदाराचे समाधान झाले नसल्यास मा.आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचेकडे पुढील ६० दिवसांत अपिल दाखल करता येईल.

Scanned with CamScanner

२४.**सेवा समाप्तीसाठी वयाची अट :** या शासन निर्णयान्वये नियुक्त होणा-या अंगणवाडी सेविका व मदतनिस यांची सेवा वयाची ६० वर्षे पुर्ण होईपर्यंत किंवा त्या शारीरिक दृष्टया काम करण्यास सक्षम नसल्यास यापैकी जे आधी घडेल तोपर्यंतच सुरु ठेवण्यात येईल.

२५. जाहिरातीमधील कोणत्याही मुद्दयाबाबत साशंकता अगर संदिग्धता निर्माण झाल्यास संबंधित शासन निर्णयातील तरतुदी अंतिम राहतील.

२६. **पत्रव्यवहार :** भरती प्रक्रियेसंबंधी अर्जदारांस कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. सर्व सुचना जाहिरातीमधील अटी व शर्तीप्रमाणे असुन वेळोवेळी देण्यात येणा-या सुचना कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येतील.

२७. **महत्त्वाची सुचना :** सदर भरती प्रक्रिया उपरोक्त शासन निर्णय दि.०२.०२.२०२३ अन्वये राबविण्यात येणार असुन निवड व नियुक्ती गुणवत्ता यादीनुसार करण्यात येणार आहे. करीता उमेदवारांनी कोणत्याही भुलथापांना अथवा अफवांना बळी पडू नये. तसेच कोणाशीही आर्थिक व्यवहार करु नये. कोणीही व्यक्ती नोकरी लावुन देण्याच्या बहाण्याने पैशांची मागणी करीत असल्यास **तात्काळ पोलिसांना संपर्क साधावा.**

२८. **भरती प्रक्रिया वेळापत्रक :-**

१) प्रकल्प स्तरावर अर्ज स्विकारण्याचा कालावधी :- दि.०९.०३.२०२३ ते दि.२३.०३.२०२३ सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळून)

२) प्राथमिक गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे :- दि.०६.०४.२०२३.

५) आक्षेप/तक्रारी अर्ज सादर करण्याचा कालावधी:- दि.०६.०४.२०२३ ते दि.१७.०४.२०२३.

६) आक्षेप/तक्रारी अर्ज तपासण्याचा कालावधी :- दि.१८.०४.२०२३ ते दि.२७.०४.२०२३.

७) अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करणे :- दि.२८.०४.२०२३.
(आक्षेप/तक्रारी प्राप्त न झाल्यास दि.१८.०४.२०२३)

**अर्ज सादर करण्याचा पत्ता :- बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) मालेगांव, जि.नाशिक यांचे कार्यालय, नंदादीप बिल्डिंग, संदेश सिनेमागृहाजवळ, मालेगांव, जि.नाशिक.**
दुरध्वनी क्रमांक ०२५५४-२५५७८०.

**ठिकाण :** मालेगांव.
**दिनांक :** ०९.०३.२०२३.

बाल विकास प्रकल्प अधिकारी,
(नागरी) मालेगांव, जि.नाशिक.

Scanned with CamScanner

**बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) मालेगांव अंतर्गत सेविका व मदतनसि भरती प्रक्रिया सन २०२२-२३**

**रिक्त सेविका पदे दर्शविणारा तक्ता अ. महानगरपालिका मालेगांव शहर (एकुण रिक्त पदसंख्या-०४)**

| अ. क्र. | अंगणवाडी केंद्र क्रमांक | अंगणवाडी केंद्राचे नांव | भरावयाचे सेविका पद संख्या |
|---|---|---|---|
| १. | २६ | नवा आझाद नगर | ०१ |
| २. | १० | आएशा नगर | ०१ |
| ३. | ४४ | रौनकाबाद | ०१ |
| ४. | १२० | जाफर नगर | ०१ |

**रिक्त मदतनिस पदे दर्शविणारा तक्ता ब. महानगरपालिका मालेगांव शहर(एकुण रिक्त पदसंख्या-६४)**

| अ. क्र. | अंगणवाडी केंद्र क्र. | अंगणवाडी केंद्राचे नांव | भरावयाचे सेविका पद संख्या | अ. क्र. | अंगणवाडी केंद्र क्र. | अंगणवाडी केंद्राचे नांव | भरावयाचे सेविका पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ३ | आंबेडकर नगर | ०१ | ३३ | १८ | बापु गांधी नगर | ०१ |
| २. | ५८ | श्रीराम नगर | ०१ | ३४ | ३८ | चमन नगर | ०१ |
| ३. | १०० | मोतीबाग नाका | ०१ | ३५ | ४२ | शबीर नगर | ०१ |
| ४. | ११८ | संगमेश्वर | ०१ | ३६ | ४५ | गयास नगर | ०१ |
| ५. | १२३ | मोतीबाग नाका | ०१ | ३७ | १०४ | बापु गांधी नगर | ०१ |
| ६. | १३९ | नवी वस्ती मोतीबाग नाका | ०१ | ३८ | १०९ | मदनी नगर | ०१ |
| ७. | ५० | हिंमत नगर | ०१ | ३९ | ३० | कमालपुरा | ०१ |
| ८. | ५३ | पंचशील नगर | ०१ | ४० | ३९ | यासिन मिया का तकिया | ०१ |
| ९. | ५४ | हिंमत नगर | ०१ | ४१ | ६५ | कमाल पुरा | ०१ |
| १०. | १३५ | शिवाजी नगर | ०१ | ४२ | ७२ | प्रबुध्द नगर | ०१ |
| ११. | १३८ | श्रीकृष्ण नगर | ०१ | ४३ | ८३ | मोमीन पुरा | ०१ |
| १२. | १४१ | कैलास नगर | ०१ | ४४ | ९२ | अलिअहमद कंपाऊंड | ०१ |
| १३. | १५० | गणेशवाडी कॅम्प | ०१ | ४५ | ९३ | समदअली कंपाऊंड | ०१ |
| १४. | १९ | सिध्दार्थ वाडी | ०१ | ४६ | १२१ | आएशा नगर | ०१ |
| १५. | ३७ | गेंदा मैदान | ०१ | ४७ | १२७ | जुना इस्लामपुरा | ०१ |
| १६. | ४९ | सिध्दार्थ वाडी | ०१ | ४८ | १३२ | बिस्मीला नगर | ०१ |
| १७. | ८० | मुस्लिम नगर | ०१ | ४९ | १५१ | इदगाह झोपडपट्टी | ०१ |
| १८. | ९८ | भायखळा झोपडपट्टी | ०१ | ५० | २७ | गोल्डन नगर | ०१ |
| १९ | ९९ | इस्लामाबाद | ०१ | ५१ | ४४ | रौनकाबाद | ०१ |
| २०. | ५ | निहाल नगर | ०१ | ५२ | ७३ | अब्बास नगर | ०१ |
| २१. | ७ | हिंग्लाज नगर | ०१ | ५३ | ७४ | अब्बास नगर | ०१ |
| २२. | २३ | सलिम नगर | ०१ | ५४ | ७५ | गुलशनाबाद | ०१ |
| २३. | ४१ | सुन्नीपुरा | ०१ | ५५ | ७६ | मुस्लिम नगर | ०१ |
| २४. | ५९ | शफी नगर, स.नं.५५ | ०१ | ५६ | ७७ | मुस्लिम नगर | ०१ |
| २५. | ६० | निहाल नगर | ०१ | ५७ | ७८ | हड्डी नगर कालि खोली | ०१ |
| २६. | ८७ | नया इस्लामपुरा | ०१ | ५८ | ११२ | गुलशन ए इब्राहिम | ०१ |
| २७. | ९४ | मर्चंट नगर | ०१ | ५९ | ११९ | जाफर नगर | ०१ |
| २८. | ९५ | आंबेडकर नगर स.नं.५५ | ०१ | ६० | १२० | जाफर नगर | ०१ |
| २९. | ८ | बुध्दविहार आंबेडकर नगर स.नं.५५ | ०१ | ६१ | १३१ | दत्त नगर | ०१ |
| ३०. | १२५ | राहुल नगर | ०१ | ६२ | १४८ | महेवी नगर | ०१ |
| ३१. | १५ | जुना आझाद नगर | ०१ | ६३ | १५२ | जेतुनपुरा | ०१ |
| ३२ | १७ | मदनी नगर | ०१ | ६४ | १५४ | सत्तार आझमी नगर | ०१ |

**रिक्त मदतनिस पदे दर्शविणारा तक्ता क. नगरपालिका सटाणा शहर (एकुण रिक्त पदसंख्या-०२)**

| अ. क्र. | अंगणवाडी केंद्र क्रमांक | अंगणवाडी केंद्राचे नांव | भरावयाचे मदतनिस पद संख्या |
|---|---|---|---|
| १ | १५६ | चौगांव बर्डी सटाणा | ०१ |
| २. | १६० | बागायत पांदी सटाणा | ०१ |

**टिप : कोणतीही पुर्व सुचना न देता वरील रिक्त पदांमध्ये कमी-जास्त बदल होऊ शकतो.**

बाल विकास प्रकल्प अधिकारी
(नागरी) मालेगांव, जि. नाशिक

Scanned with CamScanner

# अंगणवाडी सेविका/मदतनिस पदासाठी अर्जाचा विहित नमुना

प्रति,
मा.बाल विकास प्रकल्प अधिकारी,
(नागरी)-मालेगांव, जि.नाशिक.

| उमेदवाराचा पासपोर्ट साईज फोटो |
|---|
| स्वाक्षरी |

मी खाली सही करणार ------------- या शहरातील रहिवाशी असुन आपल्या प्रकल्पातील -------------/-------------- या पदासाठी अर्ज सादर करीत आहे. (ज्या पदासाठी अर्ज केला आहे. उदा.सेविका/मदतनिस त्या पदाचे नांव वरील रिक्त जागी लिहावे. एका पदासाठी अर्ज केला असेल तर एकाच पदाचे नांव लिहावे व दोन्ही पदासाठी अर्ज केला असेल तर दोन्ही पदाचे नांव लिहावे.) त्यासाठी माझी माहिती खालीलप्रमाणे आहे.

१) विवाहापुर्वीचे नांव :- --------------------------------------------

२) विवाहानंतरचे नांव :- --------------------------------------------

३) संपुर्ण पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक :- --------------------------------------------

............................................................

............................................................

४) जन्मतारीख (जन्मतारीख नोद असलेले कोणत्याही एका प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडावी) :- --------------------------------------------

५) जाहिरात प्रसिध्दीचे दिनांकास वय :- ---------वर्षे-----------महिने-------------दिवस

६) धर्म ___________ ७) जात / पोटजात :- -------------- संवर्ग --------------

८) मागासवर्गीय आहे काय ? :- होय / नाही
(असल्यास जातीचे प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडावी)

९) उमेदवार स्थानिक रहिवाशी आहे काय ? :- होय/नाही
(असल्यास सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सत्यप्रत जोडावी)

१०) विवाहित / अविवाहित :- --------------------------------------------

११) हयात असलेल्या अपत्यांची संख्या :- मुले --------, मुली-------- , एकुण अपत्ये -------
(सर्व अपत्यांचे जन्मदाखले जोडावे)

१२) विधवा / अनाथ आहे काय? :- --------------------------------------------
(अटी व शर्तीमध्ये नमुद शासकिय दस्तऐवज जोडावा)

१३) शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | शिक्षण | उत्तीर्ण वर्ष | शाळेचे/बोर्डाचे/ विद्यापिठाचे नांव | गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | इयत्ता दहावी | | | | |
| ०२. | इयत्ता बारावी | | | | |
| ०३. | पदवी | | | | |
| ०४. | पदव्युत्तर पदवी | | | | |
| ०५. | पदविका | | | | |
| ०६. | डि.एड | | | | |
| ०७ | बी.एड | | | | |
| ०८ | शासनमान्य संस्थेचे संगणक परिक्षा प्रमाणपत्र | | | | |
| ०९. | इतर | | | | |

Scanned with CamScanner

१४) अनुभव असल्यास अनुभवाचा तपशिल

| शासनमान्य अंगणवाडीचे नांव व पत्ता | पद | कालावधी (पासुन-पर्यंत) |
|---|---|---|
| | | |

वरीलप्रमाणे दिलेली माहिती खरी असुन खोटी/चुकीची आढळल्यास माझा अर्ज बाद करण्यात येईल किंवा माझी निवड/नियुक्ती झाल्यानंतरही माझी निवड/नियुक्ती रद्द करण्यात येईल व त्यांस माझी काहीही हरकत नसेल व नियमानुसार कारवाईस मी पात्र ठरेल, याची मला पुर्ण जाणीव आहे. तसेच जाहिरातीत नमुद अटी व शर्ती मी पुर्णपणे वाचलेल्या असुन त्या सर्व मला मान्य आहेत.

ठिकाण :

दिनांक :

---------------------

**(उमेदवाराचे नांव व सही)**

## <u>प्रतिज्ञापत्र</u>

मी श्रीमती -----------------------------------------------------------------------------------------,

श्री/श्रीमती --------------------------------------------- यांची मुलगी/पत्नी वय----------वर्षे राहणार-----------------------------------

--------------------------------------याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करते की,

(१) मी अंगणवाडी सेविका/मदतनिस या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला खालीलप्रमाणे हयात मुले/मुली आहेत.

| अ.क्र. | अपत्याचे नांव | स्त्री/पुरुष | जन्मतारीख |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल, किंवा भविष्यात दोन पेक्षा अधिक मुले झाल्यास, मानधनी पदासाठी मी अनर्ह/अपात्र ठरविण्यास किंवा कमी करण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

(४) मला दोनपेक्षा जास्त मुले होणार नाहीत यासाठी मी कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया करुन घेण्याची प्रतिज्ञा करते.

ठिकाण :

दिनांक :

---------------------

**(उमेदवाराचे नांव व सही)**

Scanned with CamScanner